# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (दक्षिण कक्ष)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

क्र.मजीप्रा-२०२२/बैठक-१५३/(५४)/आ.४ दिनांक : १ /१२/२०२२

**प्रति,**
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (व्यय) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय** :दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५३व्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १५३ व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

मान्यतेने.

सहपत्र :- इतिवृत्ताची प्रत

आपली विश्वासू,
DSD 1/12/22

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी.**

**प्रत:- माहितीसाठी.**
खाजगी सचिव (मा.मंत्री,पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांचे कार्यालय,मंत्रालय,मुंबई.)
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत: माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त),महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद /अमरावती/नागपूर.

अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा, म.नि.सं. व सं.कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई.

अधीक्षक अभियंता (मुख्यालय),म.जी.प्रा., मुंबई.

सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबींवर योग्य ती कार्यवाही त्वरित करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५३व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १५३वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्री महोदय यांचे दालन क्र.४०२, चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई येथे मंगळवार दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ सकाळी ११.१५ वाजता संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.

२) श्री.राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

३) श्री.संजीव जयस्वाल, प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई

४) श्री.संजय खंदारे, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

५) श्री.अभिषेक कृष्णा, सदस्य सचिव म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.ज.अ.शेख, सह सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) श्री.राजेंद्र मडके, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

३) श्रीमती दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.

४) श्री. प्रशांत भामरे, अधीक्षक अभियंता (मु.), म.जी.प्रा.मुंबई.

सर्व प्रथम सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.:- १ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या च्या १५२व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १५२वी बैठक दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, कार्यक्रम बाब क्र.११ संदर्भात, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे दायित्व वित्त विभागाच्या सहमतीने व मंत्रीमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय दिनांक २३.०३.२०१७ अन्वये दिनांक ०१.०४.२०१७ पासून शासनाने स्विकारले आहे. तसेच, दिनांक २३.०९.२०२१ च्या शासन निर्णयाव्दारे दिनांक ०१.०४.२०१७ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला असून, सुधारीत वेतनसंरचनेनुसार सुधारीत वेतन दिनांक ०१.१०.२०२१ पासून रोखीने अदा करण्यात येत आहे. सदर वस्तुस्थिती चर्चेत मांडून उपरोक्त ठराव हा मंत्रीमंडळ निर्णय व शासन निर्णयाच्या विपरीत असल्याने त्यास वित्त विभागाचे प्रतिनिधी म्हणून हरकत नोंदवून सहमती देता येत नसल्याचे प्रतिपादित केले. या संदर्भात वित्त विभागाची भुमिका इतिवृत्तात नोंदविण्यात येईल असे ठरले.

तसेच, या अनुषंगाने प्रधान सचिव पा.पु. व स्व.वि. यांनी पाणी पुरवठा विभागामार्फत वित्त विभागास प्रस्ताव फेरविचारार्थ सादर करण्यात येईल असे मा.संचालक मंडळास अवगत केले. अशा प्रकारे १५२व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र. २:-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १५२व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी संपन्न झालेल्या १५२व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १५२व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/ अस्वीकृतीच्या निर्णयाबाबत संचालक मंडळास अवगत करुन घेण्याविषयीच्या सूचना असल्याने, निविदा समितीच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या १४५ व्या बैठकीपर्यंत

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

निविदा समितीत घेतलेल्या स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयाबाबत कार्यक्रम बाबीनुसार संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव पारीत करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयाबाबत संचालक मंडळास अवगत करुन घेण्याविषयीच्या सूचना असल्याने, निविदा समितीच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्य निविदा समितीच्या १३६ व्या बैठकीपासून १४५ व्या बैठकीपर्यंतच्या बैठकींमध्ये निविदा स्वीकृतीच्या/अस्वीकृतीच्या निर्णयांवर संचालक मंडळाकडून शिक्कामोर्तब करण्यात येत असून या निविदा समितीच्या १३६ व्या बैठकीपासून १४५ व्या बैठकीपर्यंतच्या घेण्यात आलेल्या निर्णयांना मान्यता देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१७-१८ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१७-१८ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालाबाबत सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१७-१८ या वर्षाचा वार्षिक प्रशासनिक अहवाल स्विकृत करण्यात येत असून तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१८-१९ चा वार्षिक प्रशासनिक अहवाल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१८-१९ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालाबाबत सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळास अवगत केले. सदर

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१८-१९ या वर्षाचा वार्षिक प्रशासनिक अहवाल स्विकृत करण्यात येत असून तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील उपलेखापाल तसेच कनिष्ठ लिपीक/वरीष्ठ लिपीक संवर्गातील जे कर्मचारी विभागीय लेखापाल श्रेणी परिक्षेसाठी पात्र आहेत व ज्यांनी परिक्षेस बसण्याची संमती दर्शवली आहे, अशा कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत परिक्षा घेणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील उपलेखापाल तसेच कनिष्ठ लिपीक/ वरिष्ठ लिपीक संवर्गातील जे कर्मचारी विभागीय लेखापाल श्रेणी परिक्षेसाठी पात्र आहेत व ज्यांनी परिक्षेस बसण्याची संमती दर्शविली आहे अशा कर्मचाऱ्यांचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत परिक्षा घेणेबाबत प्रस्तावित होते. त्याअनुषंगाने सदरची कार्यक्रम बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळासमोर ठेवण्यात आली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन मान्यता घेऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव पारित करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील विभागीय लेखापाल पदावर नियुक्ती करण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम दिनांक २१.१०.१९९७ मधील नियम १० मधील तरतुदीनुसार विभागीय लेखापाल परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सबब, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील उपलेखापाल तसेच कनिष्ठ लिपीक/वरिष्ठ लिपीक संवर्गातील इच्छूक असलेल्या पात्र कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक यांचेमार्फत परिक्षा घेण्यासाठी या ठरावाव्दारे संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. सदस्य सचिव यांना अनुषंगीक कार्यवाहीसाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

या अनुषंगाने आवश्यक पुढील कार्यवाही करण्याकरिता सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.७ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकाऱ्यांना विमान प्रवास सवलत अनुज्ञेय ठरविण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकाऱ्यांना अत्यावश्यक कार्यालयीन कामाच्या अनुषंगाने बैठकीसाठी उपस्थित राहणेसाठी विमान प्रवास सवलत अनुज्ञेय ठरविण्याबाबत प्रस्तावित होते. त्याअनुषंगाने सदरची कार्यक्रम बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा. संचालक मंडळासमोर ठेवण्यात आली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन मान्यता घेऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव पारित करण्यात येतो की, शासन निर्णय, दिनांक २० एप्रिल, २००४ व दिनांक २१ जानेवारी, २०११ मधील तरतूदी विचारात घेऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक दिनांक ७/२/२०१३ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकात सुधारणा करून वरिष्ठांच्या निर्देशानुसार कार्यालयीन कामाच्या अनुषंगाने बैठकीसाठी उपस्थित राहण्याकरिता मुख्य अभियंता (सर्व), अधीक्षक अभियंता (सर्व) तसेच मध्यवर्ती कार्यालयातील संचालक (वित्त), मुख्य प्रशासकीय अधिकारी यांना अत्यावश्यक कार्यालयीन कामाच्या बैठकीकरिता दोन्ही वेळेच्या (येणे व जाणेकरीता) विमान प्रवासास खालील अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. कार्यालयीन कामाच्या अनुषंगाने बैठकीसाठी विमान प्रवास करावयाचा झाल्यास मुख्य प्रशासकीय अधिकारी यांच्यामार्फत सदस्य सचिव यांना लेखी स्वरूपात अवगत करणे आवश्यक राहील.

२. सदर प्रवास हा अल्प दराने सेवा पुरविण्याऱ्या विमान कंपन्याच्या विमानाने व इकॉनॉमी क्लासनेच करणे आवश्यक राहील.

३. बिझनेस/एक्झीक्युटिव्ह क्लासने करण्यात आलेल्या विमान प्रवासाच्या खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरणार नाही.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.८ :-** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे ग्राहकांकडील पाणीपट्टीवरील विलंब शुल्क माफ करण्याच्या अभय योजनेच्या तरतुदीमध्ये सुधारणा करणेबाबत

अभय योजनेच्या तरतुदीमध्ये ग्राहकांकडील पाणीपट्टीवरील विलंब शुल्क माफ करण्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन संचालक मंडळाची मान्यता मिळाली असून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव:-**

असा ठराव पारित करण्यात येतो की,

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ग्राहकांकरीता पाणीपट्टीच्या मुळ मुद्दलावरील विलंब आकार माफीच्या सवलतीची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.मजीप्रा/वित्त-१/ वसुली/ अभय योजना/२०२२/५ दि.२१.०१.२०२२ पासून लागू केली असून सदर अभय योजनेत सहभागी होण्यासाठी अर्ज सादर करावयाची मुदत संपूर्ण योजना कालावधी पर्यंत वाढवून देण्याबाबतच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

२) प्रस्तावित केल्याप्रमाणे थकबाकीवरील विलंब आकार १००% माफीचा सवलतीचा कालावधी सप्टेंबर, २०२२ पर्यंत वाढविण्याच्या केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येते तसेच योजनेच्या यापुढील संपुर्ण कालावधीसाठी म्हणजेच मार्च, २०२३ पर्यंत मुद्दलाची पुर्ण रक्कम भरल्यास विलंब आकारात १००% माफ करण्याची सवलत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) म.जी.प्रा.ग्राहकांकरिता पाणीपट्टीवरील विलंब आकार माफीच्या सवलतीची अभय योजना १ फेब्रुवारी, २०२२ ते ३१ मार्च, २०२३ या कालावधीत राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) अभय योजने अंतर्गत दि.३१.०३.२०२२ रोजी ग्राहकांकडील थकीत असलेल्या रक्कमेवरील देय विलंब शुल्क माफीसाठी ग्राह्य धरण्याचे कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जाहीर करण्यात आलेल्या अभय योजनेत आवश्यकतेप्रमाणे केलेल्या बदलास वरील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.९ :-** पाणी पुरवठा विभागांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कर्तव्य बजावित असताना कोव्हीड-१९ या विषाणूमुळे मयत झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह सहाय्य लागू करणेबाबत.

पाणी पुरवठा विभागांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कर्तव्य बजावित असताना कोव्हीड-१९ या विषाणूमुळे मयत झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह सहाय्य लागु करण्याबाबतची कार्यक्रम बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मा. संचालक मंडळासमोर ठेवण्यात आली. त्यावर सविस्तर चर्चा होउन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव:-**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९ दिनांक २९ मे, २०२० अन्वये, कोव्हिड विषयक कर्तव्यावरील (सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार, मदत कार्य इत्यादी) कर्मचाऱ्यांच्या मृत्यूच्या सर्व प्रकरणी रू.५० लक्ष रक्कमेचे सानुग्रह सहाय्य अटींच्या अधीन प्रदान करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या धर्तीवर पाणी पुरवठा विभागांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी हे कोव्हिड विषयक सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार, मदत कार्य इत्यादी कर्तव्य बजावत असताना कोव्हीड-१९ या विषाणूमुळे मयत झालेले आहेत. केवळ अशा मयत झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना दिनांक २९.०५.२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सानुग्रह सहाय्य लागु करण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुढील उचित कार्यवाही करणेसाठी सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१० :- ठाणे येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे २ भूखंड ठाणे महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेबाबत...**

१. ठाणे (प.) येथील गडकरी रंगायतन शेजारील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जागा ठाणे महानगरपालिकेस 'सार्वजनिक पार्किंग' व्यवस्थेकरीता उपलब्ध करुन देणेबाबत;

२. **अ)** कोपरी, ठाणे (पु.) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जागा ठाणे महानगरपालिकेस 'क्लस्टर डेव्हलपमेंट' करिता उपलब्ध करुन देणेबाबत; व

**ब)** कोपरी, ठाणे (पु.) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची जागा ठाणे महानगरपालिकेस 'सॅटीस' प्रकल्पाकरिता उपलब्ध करुन देणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६, कलम क्र. १८ अन्वये मालमत्ता निहित व हस्तांतरित करण्याबाबत तरतूद आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या काही जागा आहेत. ठाणे शहरामध्ये ठाणे महानगरपालिकेतर्फे विविध योजनांतर्गत बऱ्याच ठिकाणी विविध प्रकल्प / विकास कामे सुरु आहेत. या प्रकल्पांपैकी उपरोक्त विषयांकित (१) ठाणे (प.) येथील गडकरी रंगायतन शेजारील सार्वजनिक पार्किंग, (२) कोपरी, ठाणे (पु.) येथील क्लस्टर डेव्हलपमेंट व (३) कोपरी ठाणे (पु.) येथील सॅटीस या ३ प्रकल्पांकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या असलेल्या उपरोक्त विषयांकित २ जागा ठाणे महानगरपालिकेस उपलब्ध करून देणेबाबत ठाणे महानगरपालिकेने विनंती केली आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मध्ये मालमत्ता संदर्भात खालीलप्रमाणे तरतूद आहे:**

१. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील प्रकरण- दोन मधील कलम क्र. ३ (२) नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास स्थावर आणि जंगम अशा दोन्ही मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा किंवा त्यांची विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार आहे.

२. प्रकरण- तीन मधील कलम क्र. १९ नुसार, कलम १८ अन्वये कोणतीही मालमत्ता (जलदाय विषयक, बांधकाम इमारती, प्रयोगशाळा, भंडारे, वाहने, फर्निचर व इतर फर्निशिंग) किंवा मत्ता प्राधिकरणाकडे निहित करण्याबाबत कोणतीही शंका किवा वाद उद्भवल्यास राज्य शासनाचा निर्णय अंतिम असणार आहे.

**१) ठाणे (प.) येथील गडकरी रंगायतन शेजारील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे भुखंड ठाणे महानगरपालिकेस 'सार्वजनिक पार्किंग' व्यवस्थेकरीता उपलब्ध करुन देणेबाबत...**

सन १९७० च्या सुमारास ठाणे म.न.पा.च्या मल:निसारण योजनेकरिता ठाणे म.न.पा. हद्दीतील डॉ. मुस रोड, गडकरी रंगायतन शेजारी असलेल्या मौजे ठाणे टिका नं.४, सि.स.नं. ८० पैकी हे भूखंड

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

शासनाकडून उपलब्ध झाले आहे. नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांचेकडील दि.२०.०३.२०१९ चे आदेशाने (साक्षांकन- फेरफार क्र. २४०३ प्रमाणे) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे नाव २,९२०.०० चौ.मी. क्षेत्रास मालमत्ता पत्रकावर दाखल करण्यात आले आहे. ऑगस्ट-२०२२ मधील प्रत्यक्ष सर्व्हेक्षणअंती या एकूण २,९२०.०० चौ.मी. जागेपैकी २,१९३.३७ चौ.मी. जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात आहे.

२)

**अ) कोपरी, ठाणे (पु.) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे भुखंड ठाणे महानगरपालिकेस 'क्लस्टर डेव्हलपमेंट' करिता उपलब्ध करुन देणेबाबत; व**

**ब) कोपरी, ठाणे (पु.) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे भुखंड ठाणे महानगरपालिकेस 'सॅटीस' प्रकल्पाकरिता उपलब्ध करुन देणेबाबत.**

नगर भूमापन अधिकारी, ठाणे यांचेकडील दि.१९.०३.२०१९ चे आदेशाने (साक्षांकन- फेरफार क्र. १९४५/१९ प्रमाणे) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे नाव ३,७२६.०० चौ.मी. क्षेत्रास मालमत्ता पत्रकावर दाखल करण्यात आले आहे. सदर जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात आहे. ऑगस्ट-२०२२ मधील प्रत्यक्ष सर्व्हेक्षणअंती संपूर्ण जागेचे क्षेत्रफळ ३,१६९.५३ चौ.मी. इतके असुन हि संपुर्ण जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात आहे.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी दि.२८.०७.२०२२ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. सदर बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने व तसेच ठाणे महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे उपरोक्त विषयांकित २ भुखंड ठाणे महानगरपालिकेस उपलब्ध करून देणेसंदर्भात खालीलप्रमाणे ठराव पारित करणेत आला:

**<u>ठराव:</u>**

**असा ठराव पारित करण्यात येतो कि,**

१) ठाणे (प.) येथील गडकरी रंगायतन शेजारील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे एकूण २,१९३.३७ चौ.मी. क्षेत्रफळाचे भूखंड त्यावरील अस्तित्वातील ८९३.७९ चौ.मी. क्षेत्रफळाच्या बांधकामासह ठाणे महानगरपालिकेच्या प्रस्तावित बहुमजली 'सार्वजनिक पार्किंग' व्यवस्थेकरीता उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यास या ठरावाद्वारे मान्यता देणेत येत आहे.

सदर भूखंड हस्तांतरणाच्या मोबदल्यात २,१९३.३७ चौ.मी. एवढ्या क्षेत्रफळाचे भूखंड ठाणे महानगरपालिकेने ठाणे शहरामध्ये महापालिका क्षेत्रात मध्यवर्ती ठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास विनामुल्य उपलब्ध करुन देणेस व तसेच, या उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

भूखंडावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अस्तित्वातील जागेच्या बांधकाम क्षेत्राच्या दिडपट बांधकाम क्षेत्रफळ १,३४०.६८ चौ.मी. (८९३.७९ x १.५०) हे ठाणे महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यास या ठरावाद्वारे मान्यता देणेत येत आहे.

२)

अ) मौजे कोपरी सि.स.नं. १०२५ (पै), कोपरी, ठाणे (पु.) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे एकूण ३,७२६.०० चौ.मी. एवढ्या क्षेत्रफळाचे भूखंड ठाणे महानगरपालिकेच्या ठाणे (पु.) येथील प्रस्तावित नागरी पुनरुथ्थान योजनेच्या आराखड्याअंतर्गत उपलब्ध करून देणेकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत शासनाकडून ठाणे महानगरपालिकेस 'ना हरकत दाखला (No Objection Certificate)' देणेस व तसेच, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अस्तित्वातील जागेच्या बांधकाम क्षेत्राच्या दिडपट बांधकाम क्षेत्रफळ २,४७७.१५ चौ.मी. (१,६५१.४३ x १.५०) हे ठाणे महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित नागरी पुनरुथ्थान योजनेच्या आराखड्या अंतर्गत ठाणे महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यास या ठरावाद्वारे मान्यता देणेत येत आहे.

ब) ठाणे (पु.) येथील मौजे कोपरी सि.स.नं. १०२५ (पै) येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या व ताब्यातील एकूण ३,७२६.०० चौ.मी. एवढ्या क्षेत्रफळाच्या भूखंडावरील ठाणे महानगरपालिकेच्या सॅटीस पूल प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बाधित होणाऱ्या अस्तित्वातील जागेच्या बांधकामाच्या क्षेत्रफळाच्या मोबदल्यात त्याच भूखंडावरील उर्वरित मोकळ्या जागेत त्याच स्वरुपाचे व तेवढ्याच बांधकाम क्षेत्राचे बांधकाम (पुर्नबांधणी) ठाणे महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास विनामुल्य करून देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यास या ठरावाद्वारे मान्यता देणेत येत आहे.

३) वरील अ.क्र. १ व २ मधील देय मोबदल्यानुसार, एकत्रित एकूण ५,९१९.३७ चौ.मी. (२,१९३.३७ चौ.मी. + ३,७२६.०० चौ.मी.) एवढ्या क्षेत्रफळाचे प्रचलित दरानुसार सममुल्य किंमतीचे भूखंड (मोकळी जागा) ठाणे शहरामध्ये महापालिका क्षेत्रात मध्यवर्ती ठिकाणी व एकाच ठिकाणी ठाणे महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यास या ठरावाद्वारे मान्यता देणेत येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीचे वरील सर्व भूखंड ठाणे महानगरपालिकेस हस्तांतरण करणेपुर्वी सद्यस्थितीत संबंधित ठिकाणी अस्तित्वातील कार्यरत असलेली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची कार्यालये व निवासस्थाने या सर्वांकरीता पर्यायी जागा/व्यवस्था ठाणे महानगरपालिकेने त्यांचे उपरोक्त

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रकल्प/आराखडा पूर्ण होईपर्यंत त्यांचे खर्चान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास विनामूल्य उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत सादर करण्यासाठी तसेच उपरोक्त सर्व ठराव मा.मुख्यमंत्री, तसेच या संदर्भात शासनाच्या महसूल व संबंधित सक्षम विभागांच्या पूर्व मान्यतेच्या अधीन राहून ठरावांस संचालक मंडळाची या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना प्राधिकृत करणेत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.११ :-** राज्य सार्वजनिक उपक्रमाचा तात्पुरता शिल्लक निधी शासनाच्या मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने राष्ट्रीयकृत बँकामध्ये केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.१८.१०.२०२२ रोजी संपन्न झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील शिल्लक निधी राज्य शासनाचा शासन निर्णय वित्त विभाग क्र.शासाऊ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.ऊ. दि.२७.१०.२०१५ व वित्त विभाग क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र.५१/ २०/कोषा प्रशा-५ दि.१३.०३.२०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार अल्प व दिर्घ मुदतीत गुंतवणुक करण्यात येत असते. तसेच तीच अल्प व दिर्घ मुदतीची गुंतवणुक दि.१३.०३.२०२० च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये करण्यात आलेली आहे.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दि.०१.१०.२०२१ ते ३१.०८.२०२२ या कालावधीमध्ये केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीचा गुंतवणुकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. याबाबत आवश्यक पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१२ :-** जवाहरलाल नेहरू बंदराकरीता ४० दलली पाणी पुरवठा योजना जि.रायगड ई.टी.पी. चार्जेस कमी करणेबाबत.

सदर प्रकरणी सविस्तर माहिती सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केली.

जवाहरलाल नेहरू बंदराकरीता ४० दलली (गव्हाणफाटा ते पोर्ट) पाणी पुरवठा योजनेच्या रू. १९२.७९ कोटीच्या प्रकल्प अहवालामध्ये म.जी.प्रा.चे परिपत्रक क्र. १२६, अ.क्र. ३-अ (२), दि. ३/४/२००८ नुसार १७.५% ई.टी.पी. चार्जेस आकारण्यात आले आहेत. याबाबत मा. अध्यक्ष, जे.एन.पी.अे. यांनी त्यांच्या दि. ३/१/२०२२ च्या आढावा बैठकीत व तद्नंतर लेखी

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

स्वरूपात पत्र क्र. २२१, दि. ११/४/२०२२ अन्वये ईटीपी चार्जेस कमी करण्याची मागणी केली आहे. तसेच म.जी.प्रा. व जे.एन.पी.अे कडून पुर्ण ठेव तत्वावरील सर्व कामांना ९% ई.टी.पी. चार्जेस आकारण्यात यावेत, अशी मागणी जे.एन.पी.अे. कडून करण्यात आली आहे.

सद्यस्थितीत म.जी.प्रा.कडून पुर्ण ठेव तत्वावरील कामासाठी सर्वसाधारणपणे १७.५% ई.टी.पी. चार्जेस आकारण्यात येत आहेत. तसेच जे.एन.पी.अे या संस्थेकडून स्थापनेपासुन आजतागायत सातत्याने म.जी.प्रा.स पुर्ण ठेव तत्वावर कामे देण्यात येत आहेत. तसेच वाढवण बंदरास आवश्यक पाणी पुरवठा करणेकरीता आराखडे बनविणेस जेएनपीटी कडून ठराव प्राप्त झाले आहेत.

या सर्व बाबींचा विचार करता, जे.एन.पी.अे. कडून पुर्ण ठेव तत्वावर करण्यात येणाऱ्या सर्व कामांना १७.५% ऐवजी ९% ई.टी.पी. चार्जेस आकारणी करणेबाबत चर्चा करण्यात आली.

उपरोक्त नुसार चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव:-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जवाहरलाल नेहरू बदंर पाणी पुरवठा योजना देखभाल दुरूस्ती अनुषंगिक व जे.एन.पी.अे. प्रशासनाच्या पुर्ण ठेव तत्वावरील करण्यात येणाऱ्या सर्व कामांसाठी म.जी.प्रा. कडून आकारण्यात येणाऱ्या १७.५% ई.टी.पी. ऐवजी ९% ई.टी.पी. चार्जेस आकारण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि, म.जी.प्रा.स प्राप्त होणारे ईटीपी शुल्क हे शासनाकडे जमा करावयाचे असल्याने त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१३ :-** शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.सांगोला, जि.सोलापूर. दैनंदिन देखभाल व दुरूस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करणे.

सदर प्रकरणी सविस्तर माहिती सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केली

शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.२५.०५.२००५ रोजी झालेल्या १०४ व्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच शासन निर्णय क्र. ग्रापापु-२००५/प्र.क्र.१३६/पापु-०७, दि.१०.०८.२००५ नुसार म.जी.प्रा.मार्फत १५ वर्षाकरीता

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

चालविण्यात आली. त्यानुसार योजना चालविण्याची मुदत मार्च-२०२० मध्ये संपल्याने तसेच योजनेद्वारे पाणी घेणाऱ्या गावांची कमी संख्या, योजनेवरील खर्च व मिळणारे उत्पन्न त्याचप्रमाणे म.जी.प्रा.कडील अपुरा अधिकारी/कर्मचारी वर्ग ही बाब विचारात घेऊन योजना जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.१२.०५.२०२१ रोजी झालेल्या १४८व्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्याबाबत म.जी.प्रा.कडून जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे पाठपुरावा करण्यात आला. तथापि, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी योजना हस्तांतरीत करण्यास असमर्थता दर्शविली आहे. ॲड. शहाजीबापू पाटील, विधानसभा सदस्य, सांगोला यांनी त्यांच्या दि.१९.०५.२०२१, दि.२७.०५.२०२१, दि.३१.०५.२०२१, दि.०२.०८.२०२१, दि.१४.१०.२०२१, दि.२३.११.२०२१ व दि.२३.१२.२०२१ च्या पत्रान्वये, मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, शासनास तसेच सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना सदर योजना कायमस्वरुपी म.जी.प्रा.मार्फत चालविणेबाबत विनंती केली आहे. ॲड. शहाजीबापू पाटील यांच्या दि.२३.११.२०२१ च्या पत्रावर मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी पुढील आदेशापर्यंत म.जी.प्रा.मार्फत योजना चालिवण्याबाबत निर्देश दिले आहेत. यानुसार योजना आजही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत चालविण्यात येत आहे. जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पुनर्जीवित करण्याच्या रु. २९९६०.५१ लक्ष किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

उपरोक्त नुसार चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव:-**

शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना म.जी.प्रा.मार्फत चालविण्याकरीता म.जी.प्रा.ला जी काही आर्थिक तूट येईल त्याची भरपाई शासनाकडून होणेबाबतची हमी /मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करून शासनाकडून हमी/मान्यता प्राप्त झाल्यानंतरच सदर योजनाची देखभाल व दुरूस्ती म.जी.प्रा. मार्फत करणेबाबत खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर योजना म.जी.प्रा.मार्फत चालविण्याकरीता म.जी.प्रा.ला जी काही आर्थिक तूट येईल त्याची भरपाई शासनाकडून होणेबाबतची हमी/मान्यता शासनाकडून तीन महिन्यांत प्राप्त

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

करावी. तो पर्यंत योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चालवावी. शासनाने मान्यता न दिल्यास योजनेची देखभाल व दुरूस्ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून बंद करण्यात यावी.

२. शिरभावी व ८१ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत चालविताना ग्रामपंचायतींना सध्याचे रु.११.९० प्रतिहजारी व इतर संस्थांना रु.४७.२० प्रतिहजारी दर आकारण्यात यावेत. प्रत्येक वर्षी पाणी पुरविताना दर हजारी येणारा खर्च यांचा आढावा घेऊन दर सुधारित करावे व योजनेचा तोटा कमी करावा.

३. प्रथम प्राधान्याने ग्रामपंचायतीला पाणी देऊन शिल्लक पाणी असेल तर योजनेचा तोटा कमी करण्याकरीता सुत गिरणी, औद्योगिक वसाहत, नगरपरिषद व सांगोला तालुक्यातील इतर संस्था (जसे शैक्षणिक, दुधसंस्था, महामंडळ, रस्तेविकास व्यवसायिक, इतर) यांना शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००५/प्र.क्र.१३६/पापु-७ मुंबई दि.१०/०८/२००५ या मधील अट क्र.१२ नुसार पाणी देण्याचा निर्णय घेण्यात यावा. योजनेतील शिल्लक पाण्याचा आढावा घेऊन व गावांना पाणी कमी पडणार नाही याची खात्री करुनच म.जी.प्रा.चे महसुली उत्पन्न वाढविण्याकरीता इतर संस्थांना पाणी देण्याचा निर्णय मुख्य अभियंता यांनी घ्यावा.

४. ही योजना म.जी.प्रा.मार्फत चालविण्याकरीता म.जी.प्रा.ला जी काही आर्थिक तूट येईल त्याची भरपाई करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करुन त्याची प्रतिपूर्ती मागणी करण्यात यावी.

वरील प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्रमांक-१ :**

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रा अंतर्गत १५ द.ल.ली. प्रतीदीन क्षमतेचे पॅकेज्ड (Packaged) जलशुध्दीकरण केंद्र उभारणे व तद्नुषंगीक पंपींग मशिनरी व इतर कामे म.जी.प्रा.च्या घसारानिधीतुन करण्यास मान्यता मिळणेबाबत.

सदर प्रकरणी सविस्तर माहिती सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केली

अंबरनाथ व बदलापूर शहराकरीता सद्यस्थितीत उल्हास नदीवरून १४० द.ल.ली. प्रती दिन पाणी आरक्षण उपलब्ध असून, पंपींग मशिनरी २४ तास चालवूनही ११८ द.ल.ली. ते १२२

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

द.ल.ली. प्रती दिन पाण्याची उचल करण्यात येते. त्यामुळे पाणी मागणी व प्रत्यक्ष होणारा पाणी पुरवठा यातील तफावत कमी करण्याच्या दृष्टीने तातडीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त २०.०० द.ल.ली. पाणी देण्याबाबत मुख्य अभियंता कार्यालयाचे पत्र क्र.तांशा-१/ ४१९९ दि.२८/०९/२०२१ अन्वये मागणी करण्यात आलेली आहे. सदर मागणी प्रमाणे महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाकडून अद्याप पाणी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामुळे बदलापूर येथील बॅरेज येथील जॅकवेलमधून अतिरिक्त १५.०० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उचल करून अंबरनाथ शहराला पाणी पुरवठा करणे करीता १५.०० द.ल.ली. क्षमतेचे पॅकेज जलशुध्दीकरण केंद्र व इतर अनुषंगीक कामे यांचा समावेश करून स्वतंत्र योजना तयार करून सादर करण्यात आलेली आहे. त्याची अंदाजपत्रकीय किंमत रु.४१२.८१ लक्ष (निव्वळ) व रु. ४८७.११ लक्ष (ढोबळ) इतकी आहे. तफावत असलेल्या (२०.०० - १५.००) = ५.०० द.ल.ली. पाणी अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्र ओव्हरलोडींग करून उपलब्ध होणार आहे.

दिनांक १२/१०/२०२२ रोजी मा.मंत्री महोदय (पाणी पुरवठा स्वच्छता), मंत्रालय, मुंबई यांचे दालनात झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार सदर उपाययोजना करणेच्या खर्चास म.जी.प्रा.च्या स्वनिधीतून मंजूरी देण्याबाबतचे निर्देश मा.मंत्री महोदयांनी दिले. त्यास अनुसरुन सदर प्रस्तावास अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, ठाणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. तांशा-३/ २१२१ दि.१०/१०/२०२२ अन्वये रु. ४८७.११ लक्ष (ढोबळ) किंमतीस तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली असून, सदरची कामे म.जी.प्रा.च्या घसारा निधीतुन करण्यास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मा.संचालक मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे.

उपरोक्त नुसार चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, म.जी.प्रा.च्या मालकीच्या अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रातील उल्हास नदी उद्भवावरील उपलब्ध आरक्षण १४० द.ल.ली. प्रती दिन असून, पंपींग मशिनरी २४ तास चालवूनही ११८ द.ल.ली. ते १२२ द.ल.ली. प्रती दिन पाण्याची उचल करण्यात येते. अस्तित्वातील यंत्रणा उर्वरित १८ ते २० द.ल.ली. प्रतीदिन इतके पाणी उचलण्यास व अस्तित्वातील जलशुध्दीकरण केंद्र इतके पाणी शुध्दीकरण करण्यास सक्षम नसल्यामुळे पाण्याची टंचाई निर्माण होत असल्याने याबाबत उपाययोजना म्हणून तयार करण्यात आलेल्या १५.००

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

द.ल.ली. क्षमतेचे पॅकेज जलशुध्दीकरण केंद्र व इतर अनुषंगीक कामे इत्यादींच्या रु. ४१२.८० लक्ष (निव्वळ) व रु. ४८७.११ लक्ष (ढोबळ) किंमतीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत असून, या कामी होणारा खर्च हा म.जी.प्रा.च्या घसारा निधीतून करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

या बाबत पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्रमांक-२ :**

विषय :- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना कार्यालयाचे दुरूस्ती व नुतणीकरण करणे.

सदर प्रकरणी सविस्तर माहिती सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना या कार्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सन २००१-०२ मध्ये पुर्ण करण्यात आले असून त्यास जवळपास २० ते २१ वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला असल्याने, इमारतीची बरीच पडझड झालेली आहे. सदर इमारतीमध्ये कार्यकारी अभियंता यांचे दालन, तांत्रिक शाखा विभाग, लेखा शाखा विभाग, आस्थापना शाखा विभाग, चित्र शाखा विभाग, भांडार शाखा विभाग, स्वच्छतागृह व व्हरांडा यांचा समावेश आहे. सदर इमारत नुतनीकरणांतर्गत इमारतीची दुरुस्ती, रंगकाम, पेव्हरब्लॉक टाकणे, स्वच्छता गृहाची दुरुस्ती करणे, विविध विभागांमध्ये फर्निचरचे काम करणे, नवीन सेफ्टीकटँक बनविणे, इ. कामे करणे प्रस्तावित आहे. वरील सर्व कामांसाठी रु.४२,२७,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम हे सन २०२२-२३ च्या इमारत दुरुस्ती निधी अंतर्गत वाढीव तरतुदीमधून करणे प्रस्तावित आहे. सदर कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन या कामासाठीचा खर्च प्राधिकरणाच्या इमारत दुरुस्ती निधीतुन करण्यास परवानगी देण्याची विनंती मा.संचालक मंडळास करण्यात आली.

उपरोक्तनुसार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात येत आहे.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग जालना या कार्यालयाच्या इमारत नुतनीकरण व दुरुस्तीच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय प्रदान करण्यात येत असून,

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

या कामासाठी येणारा खर्च रु.४२,२७,५००/- प्राधिकरणाच्या इमारत दुरुस्ती निधीतुन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर बाबतची कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्रमांक-३ :**

विषय :- पोलीस उपमुख्यालय बऱ्हाणपुर पाणी पुरवठा योजना ता.बारामती, जि.पुणे ई.टी.पी.चार्जेस कमी करण्याबाबत.

सदर प्रकरणी सविस्तर माहिती सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केली.

पोलिस उपमुख्यालय बऱ्हाणपूर पाणी पुरवठा योजना मजीप्रा मार्फत पुर्णठेव तत्वावर राबविण्यात येणार आहे. पोलिस अधिक्षक पुणे, ग्रामीण यांनी त्याचे पत्र क्र. ०१३८ दि. ०३.०८.२०२२ अन्वये सदर कामासाठी १७.५०% ई. टी. पी ऐवजी ३% ई.टी.पी चार्जेस आकारणी करणेबाबत विनंती केली आहे. म.जी.प्रा.च्या दि. १८.०८.२०२२ रोजी झालेल्या १४६ व्या निविदा समितीच्या बैठकीत सदर कामाची निविदा योजनेकरीता १७.५०% ईटीपी ऐवजी ३% ईटीपी आकारण्यात येऊन त्यास शासनाची मान्यता घेण्याच्या अटींच्या अधीन राहून स्विकारण्यात आली आहे. त्यानुसार योजनेकरीता १७.५०% ईटीपी ऐवजी ३% ईटीपी चार्जेस आकास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव म.जी.प्रा मध्यवर्ती कार्यालयाच्या दि. २५.०८.२०२२ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत म.जी.प्रा.कडून पुर्ण ठेव तत्वावरील कामासाठी सर्वसाधारणपणे १७.५% ई.टी.पी. चार्जेस आकारण्यात येत आहेत. पोलिस उपमुख्यालय बऱ्हाणपूर पाणी पुरवठा योजनेकरीता १७.५% ऐवजी ३% ई.टी.पी. चार्जेस आकारणी करणेबाबत चर्चा करण्यात आली.

उपरोक्त नुसार चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव:-**

पोलिस उपमुख्यालय बऱ्हाणपूर पाणी पुरवठा योजनेकरीता म.जी.प्रा. कडून आकारण्यात येणाऱ्या १७.५% ई.टी.पी. ऐवजी ३% ई.टी.पी. चार्जेस आकारण्यास मान्यता प्रदान करण्यात येत

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

आहे. तथापि, म.जी.प्रा.स प्राप्त होणारे ईटीपी शुल्क हे शासनाकडे जमा करावयाचे असल्याने त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी.

वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्रमांक-४ :**

विषय :- केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान योजने अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राप्त होणाऱ्या प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार शुल्का बाबत.

शासन निर्णय परिपत्रक क्रमांक-अमृत-२०२२/प्र.क्र.२०३/नवि-३३ मंत्रालय, मुंबई दि.१६.९.२०२२ अन्वये, केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या विविध प्रकल्पाची कामे वेगाने व सक्षमपणे अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सदर अभियानाचे प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमलेले असल्याने प्रकल्प किंमतीच्या ०.५० टक्के रक्कम प्रकल्प विकास व व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणून प्रकल्पांच्या प्रगतीच्या टप्प्यानुसार अदा करण्यात येणार आहे. तसेच अमृत २.० अभियानांतर्गत मंजूर प्रकल्पासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिक मान्यता प्रदान करणेसाठी सर्व नागरी व स्थानिक स्वराज्य संस्थाकडून प्रकल्प किंमतीच्या १ टक्का शुल्क महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राप्त होणार आहे. अमृत २.० मंजूर अभियानांतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून निवडण्याची मुभा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना राहणार आहे. यासाठी कमाल ३ टक्के मर्यादेत (PMC) शुल्क अदा करण्यात येणार आहे.

उपरोक्त शासन निर्णय परिपत्रक क्रमांक अमृत-२०२२/प्र.क्र.२०३/नवि-३३ मंत्रालय, मुंबई दि.१६.९.२०२२ मा.संचालक मंडळास कार्यक्रम बाबीव्दारे अवलोकनार्थ ठेवण्यात आला. व त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.